महाराष्ट्र विधानसभा

**पत्रक भाग – दोन**

गुरुवार, दिनांक २३ एप्रिल, २०२६ / वैशाख ३, शके १९४८

७० . **लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-**

विधानसभेचे सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक ३० जून, २०२५ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक १८ जुलै, २०२५ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या व्दितीय (पावसाळी) अधिवेशनात एकूण ३५९ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक १८ जुलै, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. ३५९ निवेदनांपैकी २६ निवेदने मा. सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आलेली होती व एकूण ३३३ निवेदनांपैकी १६९ निवेदने सोमवार, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रक भाग – २ क्रमांक १२२ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. एकूण प्रलंबित १६४ निवेदनांपैकी ११८ निवेदने गुरुवार, दिनांक २९ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रक भाग – २ क्रमांक ७ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. आता ४६ निवेदनांपैकी १५ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत. उर्वरित प्रलंबित ३१ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीद्वारे सन्मा. विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (Online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (Online) पध्दतीने निवेदने प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग -२ द्वारे अवगत करण्यात येईल.

विधान भवन,<br>मुंबई<br>दिनांक : २३ एप्रिल, २०२६

**मेघना तळेकर**<br>सचिव-२,<br>महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत :-**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य<br>
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव<br>
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी<br>
४) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय<br>
५) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय<br>
६) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय<br>
७) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय<br>
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष<br>
९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये<br>
१०) संगणक कक्ष (WEBSITE)<br>
११) एम. के. सी. एल.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. विजय वडेट्टीवार, श्री. चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७४५ पुढीलप्रमाणे आहे:-**

" भुसावळ औष्णिक केंद्राने सन १९६० मध्ये वनविभागाकडून लिजवर ११० हेक्टर जागा घेतली असणे, यावर उभारलेला अॅश पॉड (राखेचा बंड) सन २००६ मध्ये १०० टक्के भरल्याने बंद करण्यात येणे, मात्र आता सोन्याचे दर आल्याने माफियांनी वन विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांना हाताशी धरुन त्यांच्यासोबत अर्थपूर्ण व्यवहार करुन या राखेची तस्करी सुरु केली असल्याची बाब माहे जून २०२५ मध्ये उघडकीस येणे, १० जेसीबी व एक पोकलँड अशा ११ वाहनांतून दररोज शेकडो ट्रक राख या बंडातून वाहून नेली जात असणे, ११० हेक्टर जमिनीत महानिर्मितीने तब्बल १०० ते १२५ फुट खोलवर ही राख असणे, या बंडात किमान २ कोटी ८० लाख मेट्रीक टन राख असणे, सध्या राखेचे प्रतीटन मुल्य २१६ रुपये असल्याने एकूण राखेचे मुल्य सुमारे ६०० कोटींच्या जवळपास असल्याने तस्करांनी गेल्या चार ते पाच महिन्यांत यातून किमान ५० कोटी मुल्याची राख विक्री केल्याचे बाब उघडकीस येणे, सचिव वने व मा. मुख्यमंत्र्यांकडे याबाबतीत तक्रारी होणे, यामुळे मात्र या भागातील मोर, ससे, हरिण, निलगाई, बिबट, खवले मांजर,अशा अनेक प्रजातींचे वन्य प्राण्यांचा अधिवास नष्ट झाला असणे, जैवविविधतेवर याचा थेट परिणाम झाला असणे, वन विभागाने याकडे लक्ष देवून जबाबदार अधिकाऱ्यांचे निलंबन करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र १९६८ पासून कार्यरत असून अनेक संचाच्या विस्तारा बरोबरच राख व्यवस्थापनासाठी राख तलाव व राख बंधारे उभारण्यात आले आहेत. याकरीता तीन टप्प्यात मुक्ताईनगर वन परिमंडळ अंतर्गत गोळेगाव येथील वन जमीन, वन विभागाने भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रास राख व्यवस्थापन बंधाऱ्याकरीता करारान्वये, प्रत्येकी ३० वर्षाच्या कालावधीकरीता हस्तांतरीत केलेली आहे. यापैकी टप्पा क्र. १ अन्वये ५५ हेक्टर जागा हस्तांतरीत केली होती. या जागेमधील राख बंधाऱ्याची क्षमता २००४ मध्ये संपल्यानंतर सदर जागा दिनांक ३०.११.२०११ रोजी वन विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेली आहे. टप्पा क्र. २ अन्वये प्राप्त ३० हेक्टर जागा दिनांक ३०.०५.२०२४ रोजी वन विभागाकडे हस्तांतरित केलेली आहे. सदर जमिनीचे पुर्नवनीकरण (Reclamation) करुन वन विभागाच्या ताब्यात देण्याबाबत वन विभागाने कळविले आहे. टप्पा क्र. ३ अन्वये प्राप्त ११५ हेक्टर जागा भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रास सन २००४ साली वन विभागाकडून हस्तांतरित झालेली आहे. सदर जागेवर राख साठवणे अद्याप सुरु असून पुढील १५ वर्षे येथे राख साठवण्याची क्षमता शिल्लक आहे.

वन विभागामार्फत वनसंवर्धन अधिनियम १९८० च्या कायद्या अंतर्गत भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रास दिलेल्या जगिनीवर सन २०२४-२५ या वर्षात वन विभागामार्फत एकूण १३ वन गुन्हे दाखल करण्यात आले असून आतापर्यंत ३ जेसीबी, ४ ट्रॅक्टर यांच्यावर कार्यवाही करण्यात आलेली आहे. सदर भागामध्ये वन विभागामार्फत नियमितपणे गस्त घालण्यात येते. तसेच गुन्हेगारांवर कार्यवाही करण्याबाबत पोलिस व महसूल विभागास त्या-त्या वेळीस कळविण्यात येते. तसेच सदर भागातील जैवविविधता/प्राण्यांच्या अधिवासात थेट परिणाम झालेला नाही.

राख बंधाऱ्याची क्षमता संपूष्टात आल्याने वन विभागास हस्तांतरित केलेल्या जागेवर जमा असलेल्या राखेची पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना दिनांक ३१.१२.२०२१ व शासनाचे राखेच्या वापराबाबतचे धोरण दिनांक १९.०९.२०२५ नुसार पर्यावरण पूरक पद्धतीने विल्हेवाट लावण्यास वन विभागास महानिर्मिती कंपनी सहकार्य करण्यास तयार आहे.

*****************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.२०६० पुढीलप्रमाणे आहे:-

"नागपूर जिल्हयातील नागपूर-उमरेड ब्रॉडगेजच्या कोळसा धुलाईचे काम भविष्यात सुरु होणार असल्याचे माहे जुलै, २०२५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास येणे, येथील मकरधोकडा खदान क्र. ३ च्या आत सुमारे ४३१ करोडचा सायलो बनविला जात असणे, जो मोठ्या वेगाने कोळसा लादू शकत असणे, उमरेड-नागपूर रेल्वेमार्गाने कोळसा धुलाईसाठी पाठविण्यात येणे, हे कोलयार्ड बनविले जात असणे, येथून मालगाडीवर कोळसा भरलाजाणार असणे, परिणामी येथील परिसर धुळीने भरलेला असताना तेथे त्यात आणखी वा होऊन पर्यावरणावर दुष्परिणाम होणार असणे, त्यामुळे येथील नागरीकांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण होणार असणे, तरी देखील नागरीकांना प्रदूषणात ढकलले जात असणे, त्यामुळे येथील नागरीक या कामाला विरोध करीत असून आंदोलने करीत असणे, परंतु शासन करीत असलेले दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, सबब, शासनाने हा प्रकल्प रद्द करणेबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

..............................................................................................................................

**मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांचे निवेदन.**

प्रादेशिक कार्यालय, नागपूर अंतर्गत तालुका उमरेड परिसरात वेस्टर्न कोलफिल्ड लि. च्या एकुण ३ खुल्या कोळसा खाणी कार्यरत असून सदर कोळसा खाणींना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने अटी व शर्तीसह संमतीपत्र प्रदान केले आहे. त्यापैकी मे. दिनेश ओपनकास्ट प्रोजेक्ट (मकरधोकडा-३), वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड, हेवती, ता. उमरेड, जि. नागपूर या खाणीचे कोळसा उत्खनन क्षेत्र सुमारे ९१९.६३ हेक्टर असून, उत्पादन क्षमता ४.५ मिलीयन टन प्रतीवर्ष एवढी आहे. सदर खाणीस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि.३१/०३/२०२६ पर्यंत संमतीपत्र प्रदान केले आहे.

सदर खाणीमधून कोळशाची वाहतुक ही खदान ते रेल्वे सायडींग पर्यंत ताडपत्रीने आच्छादित बंदिस्त ट्रकमधून करण्यात येत होती. तथापि, सदर वाहतुकीदरम्यान वातावरणीय धुळीकणांचे प्रमाण हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या संमतीपत्राच्या निकषाप्रमाणे विहित मर्यादेत ठेवणे कठीण जात असल्यामुळे, कोळशाची वाहतुक ही बंदीस्त कन्व्हेअर बेल्टने रेल्वेसायडींग पर्यंत करण्याकरीता, वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड प्रशासनाने रू.४४१.९७ कोटी इतक्या गुंतवणुकीचा First Mile Connectivity प्रकल्प दि. १७/०६/२०२१ रोजी सुरू केलेला होता. त्यामध्ये २०००० टन एवढ्या क्षमतेचा बंकर व त्यापुढे बंदिस्त कन्व्हेअर बेल्ट आणि ४००० टन एवढ्या क्षमतेचा कोळसा साठवणूक सायलो उभारणी समाविष्ट असून त्याचे काम माहे जून २०२५ ला पुर्ण झालेले आहे. सद्यस्थितीत मे. दिनेश ओपनकास्ट प्रोजेक्ट (मकरधोकडा-३) या कोळसा खाणीमधून कोळसा वाहतुक ही रेल्वे सायडींग पर्यंत बंदीस्त कन्व्हेअर बेल्टद्वारे वाहतुक करण्यात येते. सदर बंकरला ट्रिपलर कन्व्हेअर व कोळसा साठवणूक सायलोमध्ये आधुनिक पाणी फवारणी यंत्रणा (Mist Sprinkler) बसविलेले असून ती कार्यान्वित आहे.

वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड प्रशासनाद्वारे मे.दिनेश ओपनकास्ट, मकरधोकडा-३, हेवती, ता.उमरेड, जि.नागपूर या ठिकाणी कोळसा धुलाईचे काम केले जात नसून उमरेड तालुक्यामध्ये सभोवताली वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेडचा कोळसा धुलाईचा कोणताही प्रकल्पी कार्यान्वित किंवा प्रस्तावित नाही. तसेच सदर First Mile Connectivity प्रकल्पामुळे सभोवतालच्या परिसरामध्ये अथवा सभोवतालच्या गावांमधून प्रदूषणाबाबत किंवा सदर प्रकल्पामुळे नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम झाल्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार मंडळास प्राप्त झालेली नाही.

वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड प्रशासन यांचेकडून प्राप्त अहवालानुसार First Mile Connectivity प्रकल्पाबाबत परिसरातील नागरीकांकडून प्रदूषण किंवा आरोग्य विषयक तक्रारी प्राप्त झाल्या नसल्याचे कळविले आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार उमरेड तालुक्यातील हेवती येथील नागरिकांमध्ये मागील ४ ते ५ महिन्यापासून प्रदूषणासंबंधीचे आजार दिसून आलेले नाहीत.

************

लक्षवेधी सूचना २३२२

पृ/६४१

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २३२२ पुढीलप्रमाणे आहे:-**

"वेकोलि,एमसीएल,एसईसीएल,एमईसीएल आणि एससीसीएल यांच्या खाणींमधून १३ कोटी ७८ लाख ८४ हजार टन कोळसा काढण्यात येणे, खाणीतून निघणाऱ्या कोळशाची गुणवत्ता सुधारण्यासाठी महाजेनकोने कोळसा वॉशरीजना 'कोल वॉश' (कोळसा धुण्याचे) खाजगी कंत्राट देणे, वॉशरीजमधून येणारा कोळसा औष्णिक ऊर्जा प्रकल्पांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ (MSMC) यांना नोडल एजन्सी म्हणून देणे, वॉशरीजद्वारे 'कोल वॉश' नंतरचा उत्तम दर्जाचा कोळसा जाणीवपूर्वक 'रिजेक्ट कोल' म्हणून दर्शवणे, त्याची किंमत कमी दाखवून खाजगी व वॉशरी कंपन्यांमार्फत विकला जाणे, वॉशरीजने 'रिजेक्ट कोळसा' या नावाखाली २ कोटी ७५ लाख ७६ हजार ८६२ टन चांगला कोळसा खासगी कंपन्यांना विकणे, खुल्या बाजारात 'रिजेक्ट कोळसा' चे सरासरी ५,००० रुपये प्रति टन दराने विकला जाणे, ज्यामुळे १३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचा गैरव्यवहार झालेला असणे, परिणामी महाराष्ट्र सरकारच्या तिजोरीला हजारो कोटी रुपयांचा फटका बसणे, हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा कोळसा घोटाळा असणे, गैरव्यवहार व शासनाचे हजारो कोटींचे महसूल नुकसान होत असल्याने कोल वॉशरीज ही कोळसा आधारित विद्युत केंद्र (पॉवर प्लांट) परिसरातच स्थापन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**मा. मुख्यमंत्री तथा मंत्री ( ऊर्जा ) यांचे निवेदन**

महानिर्मिती कंपनीद्वारे महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाला (MSMC) वेकोली (WCL), एसईसीएल (SECL) आणि एमसीएल (MCL) यांच्या खाणीतून कोळसा उचल करुन, धुवून अशुद्ध घटक वेगळे करुन महानिर्मिती कंपनीच्या राज्यातील विविध विद्युत प्रकल्पांना पुरवठा करण्याकरीता "नोडल एजन्सी" म्हणून ५ वर्षाकरीता करारनामा करुन नियुक्त करण्यात आलेले आहे.

मार्च २०२१ ते मार्च २०२५ या कालावधीत वेकोली, एमसीएल, एसईसीएल यांच्या खाणींमधून एकूण ४,३५,२२,५२१ मे.टन कोळसा उचलण्यात आला. कंपनीनिहाय महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाला (MSMC) महानिर्मिती कंपनीद्वारे पुरवण्यात आलेल्या कोळश्याचे विवरण पुढील प्रमाणे :

| कोळसा कंपनी | कालावधी | उचल प्रमाण (मे. टन) |
|---|---|---|
| WCL | मार्च २०२१ ते मार्च २०२५ | २,५९,०२,७७८ |
| SECL | मार्च २०२१ ते मार्च २०२५ | १,२४,१६,०७२ |
| MCL | मार्च २०२१ ते मार्च २०२५ | ५२,०३,६७१ |
| | एकुण | ४,३५,२२,५२१ |

सदर खाणीतील उचल कोळसा प्रमाण आणि मानक उत्पन्न यातील फरक म्हणजे कोल वॉशरी रिजेक्ट. महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ (MSMC) सोबतच्या करारानुसार सदर कोळसा धुण्याच्या प्रक्रिये दरम्यान WCL, SECL आणि MCL या कंपनीमधून प्राप्त होणाऱ्या कच्च्या कोळशाची गुणवत्ता व करारनाम्याप्रमाणे कच्चा कोळसा धुतल्यावर खालील नमूद निर्देशित टक्केवारीनुसार रिजेक्ट कोळशाची निर्मिती अपेक्षित असते.

| कोळसा कंपनी | कोळसा ग्रेड | मानक उत्पन्न (Normative Yield) | अपेक्षित कोल वॉशरी रिजेक्ट | कोल वॉशरी रिजेक्ट दर + कंपेनसेशन सेस (रु. /मे.टन) |
|---|---|---|---|---|
| WCL | G-११ | ८५% | १५% | १००० |
| SECL | G-११ | ८०% | २०% | ७०० |
| MCL | G-१३ | ७२% | २८% | ७०० |
| **टीप: वरील तक्त्यामधील मानक उत्पन्न आणि कोल वॉशरी रिजेक्ट यातील टक्केवारीमध्ये कोळश्याच्या ग्रेड नुसार बदल होतो.** | | | | |

धुतलेल्या कोळशाची गुणवता व प्रमाण (मानक उत्पन्न) आणि कोल वॉशरीज रिजेक्टचा मोबदला यांच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळा (MSMC) सोबत झालेल्या करारानुसार कोल वॉशरी रिजेक्टचे दर वरील प्रमाणे असून ते मिळाल्यानंतर कोल वॉशरी रिजेक्ट हा महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाच्या (MSMC) मालकीचा होतो.

महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाद्वारे (MSMC) रिजेक्ट कोळशाची विल्हेवाट लावण्यापूर्वी केंद्र शासनाद्वारे नियुक्त क्षेत्रिय कोल कंट्रोलर (CCO- Coal Controller's Organisation) यांच्याद्वारे रिजेक्ट कोळशाची चाचणी करुन त्यांची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. Coal Controller's Organisation च्या क्षेत्रिय कार्यालयाद्वारे रिजेक्ट कोळशाची नमूना तपासणी केली जाते व त्यांच्याद्वारे परवानगी प्राप्त झाल्यावरच सदर रिजेक्ट कोळशाची विल्हेवाट महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाद्वारे (MSMC) करण्यात येते त्याबाबतचे मासिक विवरणपत्र महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाद्वारे (MSMC) Coal Controller's Organisation च्या क्षेत्रिय कार्यालयांना सादर करण्यात येते.

मागील ०४ वर्षात महानिर्मिती कंपनीतर्फे महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाद्वारे (MSMC) सदर खाणीतील कोळशाची उचल करण्यात आलेली असून धुलाई उपरांत झालेल्या रिजेक्ट कोळशाची आकडेवारी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाद्वारे (MSMC) प्राप्त करुन घेण्यात आली असून खालील तक्त्याप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | क्षेत्र | रिजेक्ट कोळसा उत्पन्न (मेट्रीक टन) | रिजेक्ट कोळसा विल्हेवाट (मेट्रीक टन) |
|---|---|---|---|
| १ | WCL | ४२,५९,५०७.१६ | ३३,३१,७५९.७५ |
| २ | SECL | २४,५२,७३५.५७ | २२,८६,१३७.४८ |
| ३ | MCL | १४,६५,२७७.२३ | १२,६०,९८१.२८ |
| | एकुण | ८१,७७,५१९.९६ | ६८,७८,८७८.५० |

कोल वॉशरीतून निघालेल्या वॉशरी रिजेक्टची, नियमाप्रमाणे तसेच कोल कंट्रोलरच्या (Coal Controller's Organisation) परवानगीने महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाद्वारे (MSMC) विल्हेवाट लावण्यात येते. धुतलेल्या कोळशा संदर्भात नमूद केलेल्या प्रमाण आणि गुणवत्तेसाठी कोळशाचे निकषपालन न केल्याबद्दल महानिर्मिती कंपनी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाद्वारे (MSMC) करारानुसार दंड लागू करते.

धुतलेल्या कोळशाच्या गुणवत्तेची सुनिश्चितता राखण्यासाठी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाने कोळसा पुरवठ्याच्या सर्व टप्प्यावर २४x७ देखरेख व निरिक्षण प्रणाली करीता स्वतंत्र मॉनिटरिंग एजन्सी नियुक्त केली आहे.

औष्णिक विद्युत केंद्रांना पुरविल्या जाणाऱ्या कोळशाची गुणवत्ता तृतिय पक्ष एजन्सीद्वारे (Third Party Sampling Agency) तपासली जाते. तपासणीची प्रक्रिया महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक वीज केंद्र, Central Coal & Oil Testing Laboratory (CCOTL) व महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाच्या (MSMC) प्रतिनिधींच्या उपस्थितीत पार पडते. महानिर्मिती कपंनीद्वारे सादर करण्यात आलेले विश्लेषण अहवाल मान्य नसल्यास सदर कोळसा नमूना तपासणी महानिर्मितीद्वारे केंद्र शासनाच्या मान्यता प्राप्त तृतिय पक्ष (National Accreditation Board for Testing and Calibration Laboratories) प्रमाणित तपासणी केंद्रावर (प्रयोगशाळा) सदर धुतलेल्या कोळशाची गुणवत्ता तपासून अंतिम स्वरुपात ग्राह्य धरली जाते.

महानिर्मिती कंपनीच्या महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाद्वारे (MSMC) वॉश कोळश्याच्या करारात गुणवत्ता निकष व दंड प्रक्रिया स्पष्टपणे नमूद केलेल्या असून, निकषांचे उल्लंघन झाल्यास महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळावर (MSMC) दंड लागू केला जातो. या अन्वये गुणवत्तेच्या अनुषंगाने आवश्यक काळजी घेतली जात असून निगराणी यंत्रणांमार्फत नियमित तपासणी प्रक्रिया राबविली जाते.

महानिर्मिती कंपनीला कोळसा वॉशरी सुरु करण्यासंदर्भात तांत्रिक व वाणिज्यिक व्यवहार्यतेबद्दलचा सविस्तर प्रस्ताव तयार करण्यास सूचित करण्यात आले आहे.

*****************

# महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन लक्षवेधी सूचना क्र.१६८९

श्री. अशोक पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६८९ पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबई उपनगर जिल्ह्यातील भांडुप पश्चिम येथील अनेक विकासकांकडून रखडलेले गृहनिर्माण प्रकल्प तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प भोगवटा प्रमाणपत्र न घेताच नियम डावलून बेकायदेशीररित्या बांधकामे करणे, झोपडीधारकांना भाडे न देणे, सेलच्या इमारती बांधून त्या विक्री करून व्यवसाय करणे, झोपडीधारकांची फसवणूक करणे, त्यांना वेळेवर भाडे न देणे, तर काही विकासक बांधकाम थांबवून रखडवत ठेवणे, अशा विकासकांना शासनाने बांधकाम पूर्ण केल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देण्यात (ओ.सी.) येऊ नये, सदर बेकायदेशीर तसे अनधिकृत बांधकामे करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या भांडुप (प) येथील विकासकांबाबत भांडुप येथील नागरिकांत पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष, पसरलेले चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने सदर विकासकांची सखोल चौकशी करून करावयाची कठोर कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

भांडूप (पश्चिम) मतदार संघात एकूण ७७ झोपडपट्टी पुनर्वस योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत मंजूर करण्यात आलेल्या आहेत. यापैकी ६७ झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रगतीपथावर आहेत तर १० झोपडपट्टी पुनर्वसन योजना विकासकाच्या आपसातील वादामुळे, अकार्यक्षमतेमुळे, भाडे थकविल्यामुळे, न्यायालयीन वादांमुळे रखडलेल्या आहेत. त्यापैकी ४ योजनांमध्ये १३ (२) नूसार विकासक बदलण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. व उर्वरित ६ योजनांमध्ये १३ (२) नूसार विकासकावर कारवाई सुरु आहे.

तसेच, विकासकाने बेकायदेशीर रित्या व नियम डावलून बांधकाम केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक आणि शहर नियोजन अधिनियम, १९६६ (MRTP Act. १९६६) अंतर्गत कार्यवाही करण्यात येते. विकासकाने झोपडीधारकांचे भाडे थकविण्याच्या तक्रारी प्राधिकरणाच्या निदर्शनास आल्यानंतर संबंधित योजनेच्या विक्री घटकाला Stop Work Notice देण्यात येते व प्राधिकरणाच्या परिपत्रक क्र.२१० नुसार ज्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये भाडे थकीत आहे, अशा योजनेला पुढील

कोणत्याही परवानग्या देण्यात येत नाहीत. नविन प्रकल्पारा आशयपत्र निर्गमित करण्यापुर्वी परिपत्रक क्र.२१० नुसार विकासकाकडून दोन वर्षाचे आगाऊ भाडे व त्यापुढील एक वर्षाचे आगाऊ धनादेश (PDC) प्राधिकरणाकडे जमा केले जातात. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.१९२ मधील तरतुदीनुसार प्रकल्पातील पुनर्वसन इमारतीचे जेवढे बांधकाम पूर्ण झाले त्याप्रमाणात विक्री घटकातील बांधकामास परवानगी देण्यात येते. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील बांधकाम पूर्ण झाल्यानंतर विकास नियंत्रण नियमावली २०३४ मधील तरतुदी तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या धोरणानुसार सर्वकागदपत्राची व अटी शर्तींची पूर्तता केल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र (OC) प्रदान करण्यात येते. भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न करता वास्तव्य असलेल्या १० योजना निदर्शनास आल्या असून त्यांना नियमानुसार नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

********

# महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२५ चे पावसाळी अधिवेशन** **लक्षवेधी सूचना क्र. २०५५**

**मा. श्री. सुनिल प्रभु, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २०५५ पुढीलप्रमाणे आहे :-**

" "मुंबईतील चेंबूर पुर्व, लालडोंगर या एस.आर.ए.योजनेत स्पेंन्टा कार्पोरेशनचे अस्पान कुपर या विकासकाने निवासी वस्तीत डोंगर फोडण्यासाठी जिलेटीन कांडयाचा बेकायदा वापर करुन स्फोट केल्यामुळे या परिसरातील रहिवाश्यांच्या घरांना तडे जाऊन प्रचंड प्रमाणात नुकसान झाल्याचा प्रकार निर्दशनास येणे,सदरहू प्रकल्पाच्या कामात जेसीबी/पोर्कलेन याद्वारे खोदकाम/भरणी करणार असल्याच्या नावाखाली जिलेटीन कांडयाचा बेकायदा वापर करणे, बालाजी चव्हाण या कंत्राटदाराने सीएस क्र.२३९ हिस्सा क्र.१ सिटीएस क्र.८२७/ए/४ए/१, मालाड, ता. बोरिवली येथील खोदकामासाठी मिळवलेल्या स्फोटक परवानाच्या वापर चेंबूर येथील घनदाट लोकवस्तीच्या लाल डोंगर परिसरात बेकायदीशीररित्या करण्यात येणे, ॲड. प्रशांत साने यांनी दि. १७.१२.२०२४ रोजी केलेल्या तक्रारीनुसार सहमुख्य नियत्रंक, (विस्फोटके) पश्चिम विभाग, भारत सरकार यांनी मुंबई पोलीस आयुक्तांना पाठविलेल्या पत्रामध्ये स्फोट करण्यासाठी कोणतीही परवानगी दिली नसल्याची धक्कादायक माहिती उघड झाली असतानाही पोलीस आयुक्त तथा चुनाभट्टी पोलीस अधिकारी यांनी अद्याप विकासकाविरुध्द बेकायदा स्फोट केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात न येणे, स्फोटाच्या तक्रारीकरिता कालावधीचे बंधन नसणे, यासंदर्भात स्थानिक नागरिकांनी मा. मुख्यमंत्री व पोलीसात लेखी तक्रार करुनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही न होणे, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही".

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

चेंबूर लालडोंगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत एकूण १० झो. पु. गृहनिर्माण संस्था आहेत. सदर जमीन ही महाराष्ट्र शासनाच्या मालकीची आहे. सदर योजनेचे क्षेत्रफळ ३०८५६.५० चौ.मी. असून सदर योजना दि. २८.०८.२००६ रोजी स्विकृत करण्यात आलेली आहे. सदर योजनेचे परिशिष्ट -२ दि. २५.०६.२००७ रोजी एकूण १५१२ झोपडीधारकांकरीता प्राप्त झाले असून योजनेस दि. २६.१२.२००८ रोजी प्रथम आशयपत्र देण्यात आलेले आहे. सदर योजनेत २ पुनर्वसन इमारती व १ विक्री इमारत यांचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यापैकी पुनर्वसन इमारत क्र. ३ या इमारतीचे काम पूर्ण झालेले असून त्यास दि. २३.०८.२०१९ व दि. ०५.०२.२०२५ रोजी भोगवटा प्रमाणपत्र

देण्यात आलेले आहे व सदर इमारतीमध्ये एकूण १५१२ पैकी ८१३ झोपडीधारकांचे पुनर्वसन केलेले आहे. तसेच पुनर्वसन इमारत क्र. २ दि. १५.१२.२०१७ रोजी जोत्यापर्यंतच्या बांधकामास परवानगी देण्यात आली असून सदर इमारतींचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. तसेच, विकासकाला नियमानुसार वेळोवेळी बांधकाम परवानगी देण्यात आलेली असून त्यानुसार विकासकाने योजनेचे काम केलेले आहे.

तसेच उक्त योजनेसंदर्भात पोलीस उप आयुक्त (अभियान), पोलीस सह आयुक्त (का व सु), मुंबई यांच्याकडून दिनांक ३०.०९.२०२५ रोजी प्राप्त झालेल्या अहवालानूसार ॲड प्रशांत साने यांनी केलेल्या तक्रारीबाबत कोणताही तक्रार अर्ज मा.वरिष्ठ कार्यालयाकडून किंवा ॲड साने यांच्या नावाने पोलिस ठाण्यात प्राप्त झाल्याबाबत अभिलेखावर नोंद असल्याचे आढळून आले नाही. तसेच, यासंदर्भात स्थानिक नागरिकांनी मा. मुख्यमंत्री व पोलीसात दिलेल्या लेखी तक्रारीच्या अनुषंगाने, चुनाभट्टी पोलीस ठाणेच्या सन २०२४ व २०२५ पर्यंतच्या अभिलेखाची पडताळणी केली असता, कोणत्याही प्रकारची तक्रार उपलब्ध नाही. तसेच, सन २०२४ व २०२५ पर्यंतच्या गुन्हे अभिलेखाची पडताळणी केली असता कोणत्याही स्वरुपाचा दखलपात्र/अदखलपात्र गुन्हा दाखल असल्याबाबत नोंद आढळून आलेली नाही.

********

# महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन लक्षवेधी सूचना क्र.२२१३

श्री. मुरजी (काका) पटेल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२१३ पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबई झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना करुन सदर प्राधिकरणाच्या माध्यमातून मुंबईमध्ये अनेक झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविले जात असणे, परंतु या योजनेच्या प्रकल्पामध्ये रहिवाश्यांना त्यांच्या हक्काच्या मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिले जात नसणे, जसे गार्डन, पार्किंग, खेळाचे मैदान व इतर मुलभूत सुविधा मिळत नसणे, परिणामी नाईलाजास्तव मजबुरीने त्यांना योजनेत मिळालेली सदनिका अतिशय अल्पदरात विक्री करुन मुंबई बाहेर जावे लागत असणे, त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील रहिवाशांमध्ये तीव्र असंतोषाची भावना निर्माण होणे, यासाठी प्रत्येक झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात त्यांच्या हक्काच्या मुलभूत सुविधा जसे गार्डन, खेळाचे मैदान, पार्किंग व इतर सुविधा देण्याची आवश्यकता, सदरच्या सुविधा न देणाऱ्या विकासकाविरुध्द कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

मुंबई झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी तसेच झोपडपट्टीधारकांचे राहणीमान व जीवनमान उंचावण्यासाठी त्यांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याच्या हेतुने महाराष्ट्र, झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम-१९७१ च्या कलम १ (अ) मधील तरतूदीनुसार सन १९९५ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. त्यानुसार विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील अधिनियम ३३(१०) अन्वये पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत झो.पु. योजना राबविण्यात येते.

या अंतर्गत झोपडीधारकांना ३०० चौ.फु.ची सदनिका विनामुल्य देण्यात येते. तसेच इमारतीच्या देखभालीकरिता देखभाल शुल्क सुध्दा देण्यात येते.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील संस्थेस २५० झोपडीधारकांमागे १ बालवाडी, १ वेल्फेअर सेंटर आणि इतर २ सुविधा सदनिका (अंगणवाडी / हेल्थ सेंटर / युवा केंद्र लायब्ररी इत्यादी) असे एकूण ४ सुविधा सदनिका (२७.८८ चौ.मी.) देण्यात येते. तसेच १०० झोपडीधारकामागे १ सोसायटी ऑफिस (२०.०० चौ.मी.) देण्यात येते. नुकतेच प्राधिकरणाने इमारतीचा दोष दायित्व कालावधी (Defect Liability Period) १० वर्ष इतका वाढविला आहे. ज्यामुळे १० वर्षे इमारतीचा खर्च विकासकामार्फत करण्याचे बंधनकारक केले आहे

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील अधिनियम १७ (३) अन्वये उद्यान / मैदानासाठी आरक्षित असलेल्या एकूण क्षेत्रापैकी ३५% भूखंड उद्यान खेळाचे मैदान यासाठी आरक्षित करुन मोकळे ठेवण्यात येते. तसेच ४००० चौ.मी. वरील क्षेत्रफळ असलेल्या योजनेमध्ये अधिनियम १४ अन्वये Amenity open space देण्यात येते. तसेच १००० चौ.मी. वरील क्षेत्रफळ असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये अधिनियम २७ अन्वये Layout open space देण्यात येते.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील अधिनियम ४४ अन्वये ८ निवासी पात्र झोपडीधारकामागे १ चार चाकी पार्किंग देण्यात येते. तसेच अनिवासी पात्र झोपडीधारकांसाठी १५० चौ.मी. क्षेत्रफळामागे १ चार चाकी पार्किंग देण्यात येते. या व्यतिरिक्त सदर पार्किंगच्या १०% पार्किंग Visitor parking म्हणून देण्यात येते.

********

लक्षवेधी सूचना क्र. १५३६

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

मा. श्री. रवी राणा, वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १५३६ पुढीलप्रमाणे आहे :-

नगरपरिषद दर्यापूर जि. अमरावती अंतर्गत विकास कामे होणेसाठी निधी मंजूर करण्यात यावा ज्या मध्ये साईनगर स्वामी विवेकानंद कॉलनी परिसरातील किसनराव ढोणे ते ठाकरे डेपो मॅनेजर यांच्या घराजवळील ते पुढे रस्त्याचे सिमेंट रस्ता बांधकाम करणे व नालीचे बांधकाम करणे किंमत २५ लक्ष रुपये हे काम करणे महत्त्वाचे असणे, रस्त्यावर पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी नाली नसल्याने रस्त्यावर पाणी साचून ओव्हर झाल्याने ते पावसाचे पाणी परिसरातील घरांमध्ये शिरते दुर्गंधी पसरते हे काम होण्यासाठी विधानसभा सदस्य यांनी दि.२७/०३/२५ रोजी विद्यमान महसूल मंत्री यांना पत्र पाठविले असणे यावर त्यांनी त्यांचे पत्र क्रमांक ८३/२५ दि.२४/४/२५ रोजी जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती अमरावती यांना जिल्हा वार्षिक योजनेतून वरील कामास मंजुरी देण्यासाठी वरील दिनांकास आदेश दिले असणे अद्यापपर्यंत कामास मंजुरी मिळाली नसणे ती तातडीने मंजूर होणे आवश्यक असणे, ती होण्यासाठी शासनाकडून निर्णय घेण्याची आवश्यकता व त्यासंबंधी करावयाची कार्यवाही व शासनाची यासंबंधी प्रतिक्रिया.

---

मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदय यांचे निवेदन

उक्त बाब नगरपरिषद दर्यापूर क्षेत्रातील असून सदर ठिकाणी कुठल्याही प्रकारचे भुमीगत गटार किंवा नाली नसल्याने नालीचे बांधकाम करणे अतिआवश्यक आहे. परंतु या एकाच ठिकाणी नाली बांधकाम केल्याने सदर परिसरातील रस्त्यावरील साचणाऱ्या पाण्याची समस्या सुटणार नाही. त्यामुळे या एकाच ठिकाणी नाली बांधकाम करणे तांत्रीक दृष्ट्या योग्य होणार नाही.

त्यास अनुसरून, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) अंतर्गत दर्यापूर शहर भुयारी गटार योजनेचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, मुंबई यांचेकडे मंजुरी करीता पाठविण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही. सदर परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्धतेच्या अधीन राहून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

*****

८/६५३

लक्षवेधी सूचना क्र.१९४८

९२३.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. सुरेश (राजूमामा) भोळे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९४८ पुढीलप्रमाणे आहे:-

" जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव स.नं. ५१०/३, ५१०/५, ५१०/७ या जमिनीच्या भू-संपादन प्रकरणात संबंधित मालमत्ता धारकांना भू-संपादन अधिकारी यांचेकडून रु. ३,२१,१३,२२४/- इतकी रक्कम आधीच अदा करण्यात आलेली असणे, जी मूळ निवाड्यानुसार ठरवलेल्या रु २,९१,७५,६७८/- पेक्षा अधिक असणे, त्यानंतर संबंधित मालमत्ता धारक यांचेकडून LAR No. ४१६/२०१३ अंतर्गत सादर केलेल्या दाव्यात, दिनांक २७/०२/२०२३ रोजी न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार भू-संपादन मोबदला वाढवून रु १५.०५ कोटी + नुकसानभरपाई व व्याजासह एकूण रु ३१.२२ कोटी अदा करण्याचे आदेश दिले असणे, याचिकाकर्त्यांनी त्यांच्या जमिनीच्या परिसरास शहरी, वाणिज्यिक, प्रगत व सुविधा-संपन्न ठिकाण असल्याचा दावा प्रतिज्ञापत्राद्वारे केला असणे, परंतु प्रत्यक्षात तो भाग शहरापासून दूर, दारिद्र्य रेषेखालील/अल्प उत्पन्न गटाच्या वस्त्या असलेला असणे, व तेथील बाजारमूल्य तुलनात्मक दृष्ट्या खूपच कमी असणे, जमिनीच्या बाजारभावाचे मूल्यांकन करताना न्यायालयाने काही इतर जमिनींच्या नोंदींचा आधार घेतला असून त्या जमिनींशी भौगोलिक, सामाजिक, व्यावसायिक संदर्भात कोणतीही समानता नसणे, त्यामुळे हे मूल्यांकन चुकीचे, अवाजवी व अन्यायकारक असणे, वरील प्रकार शासनाचे अधिकारी व वकील यांच्याशी संगनमत करून करण्यात आले असणे, याव्यतिरिक्त भूसंपादनाचे असे अनेक गैर व्यवहारचे प्रकरणे असुन त्यांची चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात यावे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

जळगाव शहर महानगरपालिका हद्दीतील स.नं. ५१०/३, ५१०/५ व ५१०/७ च्या जमीनमालकांना भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी जळगांव यांनी भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ११ च्या निवाड्यानुसार जमिनीची किंमत + ३०% दिलासा + १२% अतिरीक्त घटक रक्कम अशी एकुण रू. २,९१,७५,६७८/- इतकी जमिन मालकांना अदा केलेली आहे. रु ३,२१,१३,२२४/- अदा केलेली नाही.

हितसंबंधीत धारकांनी भुसंपादन अधिनियम, १८९४ चे कलम १८ नुसार वाढीव मोबदला मिळणेकामी LAR No. ४१६/२०१३ नुसार मे. कोर्टात निर्देशन दाखल केले असता, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर जळगांव यांनी दि.२७.०२.२०२५ रोजी वाढीव मोबदला मंजूर करुन निकाल दिलेला आहे.

मे. कोर्टाच्या दि.२७.०२.२०२५ च्या निकालानुसार जमीनीला प्र.चौ.मी. दर रुपये १७,६३६/- वाढवून दिला आहे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, जळगांव यांनी दि.२३.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये जळगांव महानगरपालिका आयुक्त यांना कोर्टाच्या आदेशानुसार वाढीव रक्कम मा. दिवाणी

न्यायालयात जमा करण्याबाबत कळविले आहे. तसेच मा. दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अपिल करण्याबाबतही कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार भूसंपादन संस्था आयुक्त जळगांव शहर महानगरपालिका यांनी मा. दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे CIVIL APLICATION NO. १०५५६/२०२५ व FA STAMP NO. २८७५३/२०२५ नुसार स्थगिती आदेश मिळणेकामी याचिका दाखल केली असता, त्यावर मे. उच्च न्यायालयाने दि.२६.०९.२०२५ रोजी आदेश पारित केले की, आधी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर जळगाव यांचे निकालानुसार वाढवून दिलेली संपूर्ण नुकसान भरपाईची रक्कम, त्यावर जमा झालेल्या आजपर्यंतच्या व्याजासह, सहा आठवड्यांच्या आत या न्यायालयात जमा करावी. त्यानंतर स्थगनादेश देण्याची कार्यवाही करता येईल. अद्यापही संपादन संस्था यांनी कोणतीही वाढवून दिलेली नुकसान भरपाईची रक्कम दरखास्तीमध्ये जमा केलेली नाही.

*********************************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी )अधिवेशन

श्री. हेमंत ओगले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१५२१ पुढीलप्रमाणे आहे:-

"कोपरगाव जि. अहिल्यानगर येथे सर्व्हे नं.४३ व ४४ ही इनाम वर्ग ६ब ची जमीन असून सर्व्हे नं.४३ क्षेत्र ११ हेक्टर ९२ आर व सर्व्हे नं.४४ क्षेत्र ८ हेक्टर ९३ आर ही जमीन निजामकाळापासून महार वतनाची असणे, ही जमीन दि.२६/०७/१९४६ रोजी वा त्यासुमारास ब्रिटिश शासनाने डेअरी,पोल्ट्री,कॅटल ब्रीडिंगसाठी अधिग्रहित केलेली असणे, दि.२३/०६/१९४८ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन उपजिल्हाधिकारी संगमनेर विभाग जि.अहमदनगर (अहिल्यानगर) यांनी सदर जमिनीचा मोबदला म्हणून रक्कम रु.१,१२,३३८.९० इतक्या रकमेचा धनादेश तत्कालीन मामलेदार कोपरगाव जि.अहमदनगर (अहिल्यानगर) यांना आहारित करण्यात येऊन त्यांच्यामार्फत संबंधितांना वितरित करणेबाबत आदेश दिलेले असणे परंतु मूळ वतनदारांना ही नुकसान भरपाई मिळालेली नसणे,सदर जमिनीपैकी सद्यस्थितीत वळू संशोधन केंद्रासाठी फक्त पाच एकर क्षेत्र वापरात असणे, उर्वरित ४५ एकर क्षेत्र पडिक असणे, त्यामुळे येथील दलित वतनदारांची ही जमीन मूळ वतनदारांच्या वारसांना परत मिळावी आणि दि.२३/०६/१९४८ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन उपजिल्हाधिकारी संगमनेर विभाग जि.अहमदनगर (अहिल्यानगर) यांच्या आदेशाप्रमाणे अधिग्रहण झाल्यापासून आजपर्यंतचा मावेजा व्याजासहित मिळावा अशी मूळ वतनदारांच्या वारसांची मागणी असणे, त्यासाठी सदर वतनदारांचे वारसदार शासनाकडे वेळोवेळी पत्रव्यवहार, आंदोलने करून आपला रोष व्यक्त करणे परंतु शासन करीत असलेले दुर्लक्ष परिणामी येथील दलित समाजामध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.."

---

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

मौजे कोपरगाव, जि. अहिल्यानगर येथील स.नं ४३ चे क्षेत्र २९ एकर १८ गुंठे व स.नं. ४४ चे क्षेत्र २२ एकर ३ गुंठे हे इनाम वर्ग ६ ब चे महार वतन क्षेत्र असल्याबाबत तहसिल कार्यालय, कोपरगाव येथील सन १८८६-८७ चे ॲलिनेशन रजिस्टर, अनुक्रमांक २३० मधील नोंदीवरुन दिसुन येते. तहसिल कार्यालय, कोपरगाव येथील फेरफार क्र. ६१८ दि. ०१/०६/१९४८ नुसार सदरील जमिनी कोपरगाव डेअरी, पोल्ट्री आणि कॅटल ब्रिडींग फार्म साठी सरकारने दि. २६/०७/१९४६ रोजी अक्वायर करुन ताब्यात घेतल्या आहेत. त्यामुळे कब्जेदारांची नावे कमी करुन डेअरी पोल्ट्री आणि कॅटल ब्रिडींग फार्मचे नाव दाखल झाल्याचे दिसुन येते.

सदर जमिनीपैकी सद्यस्थितीत वळू संशोधन केंद्रासाठी संपादित केलेल्या स.नं. ४३ क्षेत्र ११.९२ हे. आर व स.नं. ४४ क्षेत्र ८.९३ हे. आर क्षेत्रापैकी पशुसंवर्धन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली येणारे डेअरी पोल्ट्री ॲन्ड बिल्डींग फार्म संस्थेचे कार्यालय, गायींचा मोकळा गोठा व कुकूटपालनाचे पोल्ट्री शेड

(वंद स्थितीत) या करीता अंदाजे २ हेक्टर क्षेत्र आज रोजी वापरात आहे. तसेच प्रत्यक्षरित्या जनावरांचे विविध प्रकारचे चाऱ्याकरिता अंदाजे ५ हेक्टर क्षेत्र लागवडीखाली असून उर्वरीत क्षेत्र प्रत्यक्षात आज रोजी पडीत आहे.

श्री. वावासाहेव भारकर कोपरे व इतर १९ यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र. १८१३/२०२३ दाखल केलेली असुन रक्कम रु. १,१२,३३८.६९/- ही दि. २२/०६/१९४८ पासुन २५% व्याजासह मिळणेची विनंती केलेली आहे. तसेच सदर भरपाई रक्कम न मिळाल्यास स.नं. ४३ व ४४ हे क्षेत्र याचिकाकर्त्यांना परत मिळणेची विनंती केलेली आहे. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.२४/०८/२०२३ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये सदर प्रकरणी चार आठवड्यामध्ये शपथपत्र दाखल करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तद्अनुषंगाने जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी शपथपत्र दाखल करावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. सदर प्रकरणी क्षेत्रीय कार्यालयात संबंधित जमिनीची नुकसान भरपाई मिळणेबावतची निवेदने प्राप्त झालेली आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय (भुसंपादन शाखा), अहिल्यानगर व तहसिल कार्यालय, कोपरगाव यांच्या अनुक्रमे दि. ०५/०४/२०१८ व दि. १२/०७/२०१८ नुसार मौजे कोपरगाव येथील स.नं. ४३ व ४४ या संपादीत जमिनीचा मोवदला अदा केलेला आहे किंवा कसे याबावत अभिलेख उपलब्ध नसल्याचे दिसून येते. तद्अनुषंगाने उपविभागीय अधिकारी संगमनेर व जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथील अभिलेखांचा शोध घेवुन प्रकरणी भरपाईची रक्कम वितरीत केली किंवा कसे याबावत जिल्हाधिकारी यांचेमार्फत चौकशी करण्यात येत आहे.

********************************

लक्षवेधी सूचना क्र.२०५४

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. सुभाष देशमुख, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०५४ पुढीलप्रमाणे आहे:-

"सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यातील प्रताप नगर, कुमठे, सोरेगाव, सलगरवाडी गावातील शेतकऱ्यांची उजनी शाखा कालव्यासाठी शेत जमीन सन २००६ मध्ये संपादित करणे, सदर शेती जमिनी १९९२ मध्ये हद्दवाढ सोलापूर सिटी मध्ये वर्ग करण्यात आल्या परंतु सन २००६ ते २०१३ मध्ये सर्व शेतकऱ्यांच्या जमिनी उजनी कालवा विभाग क्रमांक ८ साठी खुश खरेदी करून घेतले असणे, या शेतकऱ्यांना तत्कालीन सरकारने अत्यल्प मोबदला दिला असून हा मोबदला प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन लाभक्षेत्र असलेल्या प्रकल्पामुळे पाटबंधारे प्रकल्प बाधित व्यक्तींना पुनर्वसनाच्या ध्येय सुविधांच्या (दिनांक १७ एप्रिल २००६ महसूल व वन विभाग) च्या निर्णयाप्रमाणे मिळाले नसणे, शासनाने अमरावती व विदर्भातील शेतकऱ्यांना सहानुग्रह अनुदान व प्रकल्पग्रस्त दाखला दिला त्याप्रमाणे दिलेला नसणे, त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना अमरावती व विदर्भातील शेतकऱ्यांप्रमाणे अनुदान व दाखला देण्याची मागणी केलेली असणे, याची शासनाने दखल घेऊन उत्तर सोलापूर तालुक्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान व दाखला देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना अशी मागणी मी औचित्याच्या मुद्द्याद्वारे शासनास करीत आहे."

---

### श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

भीमा (उजनी) प्रकल्पांतर्गत देगाव शाखा कालव्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यातील कुमठे मधील एकूण ९३ शेतक-यांची ३५.५१ हेक्टर, सोरेगांव मधील एकूण १७ शेतकऱ्यांची ७.३६ हेक्टर, सलगरवाडी मधील एकूण १० शेतकऱ्यांची ६.२९ हेक्टर क्षेत्र असे एकूण १५१ शेतकऱ्यांचे ६२.४६ हेक्टर जमीन भीमा (उजनी) प्रकल्पांतर्गत देगांव शाखा कालव्यासाठी कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.८, सोलापूर या भूसंपादन संस्थेसाठी थेट खरेदीने संपादीत करण्यात आली आहे.

मदत व पुनर्वसन उपविभागाकडील शासन निर्णय दि.१७/०४/२००६ अन्वये प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन लाभक्षेत्र असलेल्या प्रकल्पामुळे (पाटबंधारे प्रकल्प) बाधीत व्यक्तींना पुनर्वसनाच्या देय सुविधांबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. तथापि पाटबंधारे प्रकल्पांच्या कालव्याकरीता लांब परंतू कमी रूंदीच्या जमिनीचा पट्टा संपादीत करताना अशा संपादनासाठी नियमानुसार मोबदला अदा केल्यानंतर बाधीत शेतकऱ्यांना पुनर्वसनाचे अन्य फायदे, सुविधा/

प्रमाणपत्र देय असणार नाहीत अशी तरतूद आहे. परिणामी सदर शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्याचा प्रश्न उदभवत नाही.

सदर प्रकल्पाच्या अनुपंगाने प्रचलित नियमानुसार त्या त्या वेळी मोवदला अदा करण्यात आला असल्याने वाढीव मोवदला देय ठरत नाही. तसेच विदर्भ पाटवंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गत येणाऱ्या प्रकल्पास, अशा प्रकल्पांचे कालवध्द नियोजन करून आर्थिक व भौतिक उद्दिष्टे पूर्ण करण्याच्या अनुपंगाने व कामांची गती अवादित ठेवण्यासाठीचे निकप लागू होत असल्याने विदर्भ पाटवंधारे विकास महामंडळ, नागपूर च्या ८५ व्या वैठकीमधील निर्णयानुसार अमरावती जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांना सरळ खरेदीने सन २००६ च्या शासन निर्णय व भूसंपादन कायदा सन २०१३ प्रमाणे येणाऱ्या रकमेतील फरकाची रक्कम सानुग्रह अनुदान स्वरूपात मावेजा म्हणून मंजूर करण्यात आला अशी वस्तुस्थिती आहे.

***************************************************************************

लक्षवेधी सूचना क्र. १८५१

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. बाबासाहेब देशमुख वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८५१ पुढीलप्रमाणे आहे:-

"महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून विरार ते अलिबाग दरम्यान १२८ किलोमीटर लांबीचा मार्ग उभारणार असून, मुंबई महानगर प्रदेशातील पालघर, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांच्या विकासात विरार-अलिबाग मल्टिमॉडेल कॉरिडॉर मोलाचा ठरणार असल्याने रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील मौजे चिरनेर, हरिश्चंद्र पिंपळे, चिखली भोम, नवापाडा (विंधने), टाकी गाव या गावातील अनेक क्षेत्र भूसंपादित करण्यात येणे, रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या एका नव्या आदेशामुळे पनवेलमधील १३ गावांचे भूसंपादनाचे अधिकार पनवेल प्रांत अधिकाऱ्यांकडून काढून पुन्हा मेट्रो सेंटरच्या उपजिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात आले असता त्यांनी अनेक जमिनी कोरडवाहु असतांनाही त्या बागायती दाखवून सदर जमिनीची किंमत वाढीव दराने देऊन श्री दत्तात्रय नवले, तत्कालीन भूसंपादन अधिकारी यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक करून शासनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात येणे, या गावातील भूसंपादन संस्थेने सिमांकन केलेल्या भूसंपादीत जागेची आजही खात्री केली असता सदर जागेवर मुळ शेतकरी यांच्या वहिवाटी असून ते सदर जागेवर शेतपिके घेत असणे, परंतु काही जमिनी प्रत्यक्षात भूसंपादन सिमांकनापासुन दुर असतांनही त्या जमिनी भूसंपादित करून अनेक जमीनींची आकार फोड करून श्री. अमर गेहलोत व इतरांशी आर्थिक हितसंबंध जोपासत तत्कालीन भूसंपादन अधिकारी यांनी मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार करण्यात येणे, विरार अलिबाग कॉरीडॉरच्या महत्वाकांक्षी प्रकल्पात भूसंपादनात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार असल्याने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

---

श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, दि. १२.०८.२०२२ अन्वये विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गीका  राज्य महामार्ग (विशेष) क्रमांक-४ प्रकल्पाकरिता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांच्यामार्फत महामार्गाच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर महामार्गाच्या बांधकामासाठी आवश्यक भूसंपादन करण्यासाठी रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील मौजे-चिरनेर, हरिचंद्र पिंपळे, चिखली भोम, नवापाडा (विंधने) व टाकी गाव या गावातील खासगी जमीन भूसंपादित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राजपत्र असाधारण क्र. ३५० भाग चार व दिनांक २५/११/२०२१ अन्वये उपविभागीय अधिकारी पनवेल यांना पनवेल व उरण तालुक्यांतील जमीन संपादनासाठी प्राधिकृत करण्यात आले होते. तद्नंतर महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. ३३६ भाग चार  दि. २३/०९/२०२२ अन्वये उपविभागीय अधिकारी पनवेल यांना ता. उरण व

उपजिल्हाधिकारी, मेट्रो सेंटर क्र. १ पनवेल यांना ता. पनवेल करीता प्राधिकृत करण्यात आले. मात्र दिनांक ३०/११/२०२२ च्या राजपत्रान्वये उपविभागीय अधिकारी पनवेल यांना ता. पनवेल करीता व उपजिल्हाधिकारी, मेट्रो सेंटर क्र. १. पनवेल यांना ता. उरण करीता प्राधिकृत करण्यात आले. तसेच दि. २३/१२/२०२४ च्या अधिसूचनेन्वये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पुन्हा पनवेल तालुक्यातील एकूण २८ गावे उपजिल्हाधिकारी पनवेल यांचेकडे तसचे उर्वरीत १३ गांवे उपजिल्हाधिकारी, मेट्रो सेंटर क्र. १, पनवेल यांचेकडे वर्ग करण्याबाबत निर्णय घेण्यात आल्याचे दिसून येते.

तद्नंतरच्या कालावधीमध्ये उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, बांद्रा यांनी दिनांक ०६/०२/२०२५ रोजी पुन्हा भूसंपादन अधिकारी बदलण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला असता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील पत्र क्र. खाक्षेस-२०२१/प्र.क्र.१११/रस्ते-८, दिनांक २१ जून २०२५ अन्वये, सदर महत्वाकांक्षी प्रकल्प विहीत मुदतीत पूर्ण करणे अत्यावश्यक व अनिवार्य असल्याने भूसंपादनाच्या प्रक्रियेवर विपरीत परिणाम होऊ नये यास्तव भूसंपादन संस्थेचा प्रस्ताव अमान्य करण्यांत आला.

सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने शेतजमिनीचे/ना-विकास विभागातील जमिनीचे मूल्यांकन - अ) ७/१२ उतारा पाहणे - ग्रामीण क्षेत्रात शेतजमिनीचे मुल्यांकन करताना त्या जमिनीचे मागील ३ वर्षाचे ७/१२ उतारे पाहून व त्यावरील पिकपाण्याची व इतर शेऱ्याची नोंद पाहून जमिनीचा प्रकार (पड, जिरायत, तरीपॅडी, हंगामी बागायत, बारमाही बागायत इ.) ठरविण्याबाबतच्या तरतुदी नुसार उपविभागीय अधिकारी यांनी निवाडे तयार करण्यात आले आहेत. तसेच सदर भूसंपादन प्रकरणी सादर केलेल्या प्रस्तावानुसार उप अधिक्षक भूमि अभिलेख, उरण यांनी भूसंपादन संस्थेच्या सीमांकनानुसारच विरार अलिबाग बहुउद्देशिय ९९ मी. मार्गिका विकसित करण्याकरिता खाजगी जमीनीची संयुक्त मोजणी करण्यात आली आहे.

तसेच सदर भूसंपादन कार्यवाहीबाबत उप अधिक्षक भूमि अभिलेख, उरण यांनी सदर जमिनीशी निगडित अभिलेख, आकारफोड पंत्रक, गटबुक नकाशा, ई. अधिकार अभिलेख व जागेवरील प्रत्यक्ष वहीवाटीबाबत जिल्हाधिकारी रायगड यांच्या निर्देशानुसार फेरचौकशी करून नव्याने आकारफोड पत्रक जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांच्या मंजुरीने तहसिलदार, उरण यांचेकडे दि.२८/०५/२०२४ रोजी अंमलबजावणीसाठी पाठविले. सदर दुरुस्ती आकारफोड पत्रकाप्रमाणे ७/१२ वर अंमलबजावणीच्या अनुषंगाने कार्यवाही नियोजित आहे.

---

## महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

**सर्वश्री. अमित झनक, सुनिल प्रभू, सुधीर मुनगंटीवार, चेतन तुपे, डॉ.जितेंद्र आव्हाड, मंगेश चव्हाण, अनंत (बाळा) नर, सुनिल कांबळे, अतुल भातखळकर, देवराव भोंगळे, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २४४५ पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यातील १० वी चा निकाल लागल्यावर १५ दिवसात होणारी प्रवेश प्रक्रिया दूर ठेवून शासनाने ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया राबविणे, ही ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रिया शहरी, निमशहरी, ग्रामीण भागात अनिवार्य करण्यात येणे, मात्र नविन व्यवस्था उभी करताना शासनाने घाई करुन विद्यार्थी व पालकांना अडचणीत आणणे, या प्रवेश प्रक्रियेत सुमारे साडे तेरा लाख विद्यार्थीनी नोंदणी करणे, पैकी फक्त ५ लाख १० हजार विद्यार्थ्यांचे प्रवेश होणे, तसेच नोंदणी प्रक्रिये संदर्भात १०० रुपये शुल्क आकारले जाणे, मात्र काही ठिकाणी २०० ते ३०० रुपये वसूल केले जाणे, या शिवाय महाविद्यालयांचा पर्याय देताना विद्यार्थ्यांनी गोंधळून जाऊन चुक झाल्याने त्यांचे अनुदानित किंवा स्वयंअर्थसंहिता अशी फारकत करता न आल्याने या सर्व विद्यार्थ्यांना आर्थिक नुकसान सोसावा लागणार असणे, त्यामुळे मुंबई, पुणे, नागपूर वगळता ही प्रवेश प्रक्रिया उर्वरित ठिकाणी विद्यार्थ्यांनसाठी जटिल ठरली असणे, कोचिंग क्लास व काही महाविद्यालयांचे हित संबंध असल्याचे समोर येणे, यामुळे या प्रक्रियेतुन कला शाखा व ग्रामीण भाग वगळावा अशी मागणी होत असणे, परंतू शासन करीत असलेले दुर्लक्ष त्यामुळे शासना विरुध्द विद्यार्थी व पालकांमध्ये पसरलेला असंतोष, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रीया."

## मा. मंत्री, शालेय शिक्षण यांनी करावयाचे निवेदन

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापर्यंत इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, अमरावती या पाच विभागातील फक्त महानगरपालिका क्षेत्रातील उच्च माध्यमिक विद्यालय /कनिष्ठ महाविद्यालयात राबविण्यात येत होती. या पाच महानगरपालिका क्षेत्रातील जवळपास १७०० कनिष्ठ महाविद्यालय आणि ४.५० लाख विद्यार्थी या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होत होते. राज्य शासनाच्या "इज ऑफ लिविंग" या कार्यक्रमांतर्गत इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने २५ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२५-२६ पासून राज्यातील सर्व उच्च माध्यमिक विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी चे प्रवेश केंद्रिय ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहेत.

सन २०२५-२६ पासून संपूर्ण राज्यात इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रकिया राबविण्यात येणार असल्याने यामध्ये ग्रामीण भाग सुध्दा समाविष्ट झाला आहे. जवळपास ९४३५ उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यायांची २१२३७२० इतकी विद्यार्थी प्रवेश क्षमता आहे.त्याअनुषंगाने राज्यातील सर्व उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत सहभागी झाल्यामुळे उच्च माध्यमिक विद्यालय / कनिष्ठ महाविद्यालयांचे जिल्हास्तर तसेच विभागस्तरावरील प्रशिक्षण, प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावरील आवश्यक बदल, नविन पर्याय समाविष्ट करावयाचे कामकाज सुरु होते. तसेच

न्यायालयीन प्रकरण,संकेतस्थळावर निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणी यामुळे थोडा अधिकचा अवधी लागलेला आहे. परंतू इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या कालमर्यादेचे महत्व लक्षात घेऊन संचालनालय स्तरावरुन कंपणीस वेळोवेळी संपर्क साधुन, बैठकांचे आयोजन करुन प्रवेशाशी संबंधीत विद्यार्थी व पालकांना जाणवणा-या तांत्रिक अडचणींचे समाधान करण्यात आले आहे. तसेच प्रवेशाचे अर्ज भरण्यासाठी पुरेसा कालावधी वाढवून देण्यात आला आहे. तसेच संचालनालय स्तरावरुन तात्काळ उपाययोजना व पर्यायी व्यवस्था उपलब्ध करुन त्रुटींची पुर्तता करण्यात आली आहे.

सन २०२४-२५ पर्यंत पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर करीता रुपये १२५ /- आणि मुंबई करीता रुपये २२५ /- एवढे ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेकरीता नोंदणी शुल्क आकारण्यात येत होते. परंतू या वर्षीपासून संपूर्ण राज्यातील सर्व विद्यार्थ्यांसाठी रुपये १००/- पेक्षा जास्त शुल्क आकारण्यात आलेले नाही. प्रवेश शुल्क फक्त ऑनलाईन पध्दतीने आकारण्यात येते आहे.

११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुसुत्रिकरणाच्या अनुषंगाने दिनांक ०६.०५.२०२५ च्या शासन निर्णयान्वये सर्व विभागीय व जिल्हा स्तरावर प्रवेश नियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहेत.

**ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यामागील मुख्य उद्देश पुढीलप्रमाणे आहेत:**

- ऑफलाईन प्रक्रियेमध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्याला प्रत्येक कॉलेजमध्ये प्रत्यक्ष जाऊन माहिती घ्यावी लागत होती. सद्यस्थितीत विद्यार्थ्यांना घरबसल्या राज्यातील/जिल्ह्यातील/तालुक्यातील सर्व उच्च माध्यमिकच्या शाखा दिसणार आहेत, व राज्यातील कुठल्याही उच्च माध्यमिक विद्यालय/कनिष्ठ महाविद्यालयाकरिता प्रवेशासाठी अर्ज करता येणार आहे.
- ऑफलाईन प्रक्रियेमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रत्येक कॉलेजमध्ये वेगळे फॉर्म फी व प्रवेश फी द्यावी लागत होती. परंतू इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेशामध्ये विद्यार्थ्यांना एकच वेळी फक्त १०० रुपये/- एवढे नोंदणी शुल्क आकारण्यात येत आहे.त्यामुळे विद्यार्थ्यांचा श्रम व पैसा दोन्हीमध्ये बचत झाली आहे.
- इयत्ता ११ वी केंद्रिय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमुळे ११ वी च्या सर्व शाखेचे प्रवेश राज्यातील सर्व विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध झाले आहेत. ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थी त्यांच्या आवडीप्रमाणे शहरातील सर्व शाखांमध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेऊ शकतील.
- ऑफलाईन प्रक्रियेत विद्यार्थ्याला कनिष्ठ महाविद्यालयातील रिक्त जागा, शुल्क याची माहीती सहज उपलब्ध होत नव्हती, परंतू ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना ही सर्व माहीती ११ वी ऑनलाईन प्रवेश पोर्टल वर उपलब्ध होणार आहे.
- ऑफलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये मदतीसाठी कोणतेही कॉल सेंटर आणि सपोर्ट ई-मेल सेवा उपलब्ध नव्हती. परंतु सद्यस्थितीत इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये येणा-या त्रुटीसाठी कॉल सेंटर व सपोर्ट ई-मेल सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच ८ विभागस्तरावरील कार्यालयात टेक्नीकल सपोर्ट स्टाफ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. आणि विभागीय स्तरावरील कर्मचा-यांचे दुरध्वनी क्रमांक पोर्टलवर देण्यात आले आहे.

ट्रा६६२

- इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठीच्या पहिल्या फेरीकरीता एकूण १२७१२०१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली होती. त्यानुसार प्रथम कॅप फेरी व कोटा अंतर्गत झालेली प्रथम फेरी गुणवत्ता यादी दिनांक २८.०६.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.सदर प्रथम फेरीअंती पात्र ५७५९९० विद्यार्थ्यांनी दिनांक ३०.०६.२०२५ ते दिनांक ७.०७.२०२५ पर्यत निर्देशीत विद्यालय/महाविद्यालयात प्रवेश घेतलेले आहेत.
- दिनांक १० जुलै २०२५ पासून नियमीत दुसरी फेरी सुरु करण्यात आली असून दिनांक १३ जुलै २०२५ पर्यंत विद्यार्थांना नवीन नोंदणीसाठी कालावधी देण्यात आला होता. तसेच दुस-या फेरीची गुणवत्ता यादी दिनांक १७ जुलै २०२५ रोजी जाहीर करण्यात आली असून दुस-या फेरीतील गुणवत्ता यादीमध्ये २५१८०४ विद्यार्थ्यांना महाविद्यालय अलॉट करण्यात आले आहेत. या गुणवत्ता फेरीमधील विद्यार्थ्यांना दिनांक १८.०७.२०२५ ते दिनांक २१.०७.२०२५ पर्यंत महाविद्यालयात प्रवेश निश्चित करण्यासाठी कालावधी देण्यात आला आहे.
- इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये आता पर्यत १४०९०९३ विद्यार्थांनी नोंदणी केलेली आहे. विद्यार्थ्यांच्या तक्रारी व समस्या सोडविण्यासाठी पुरेशी खबरदारी घेण्यात आली आहे. इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही, यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे व त्यानुषंगाने वेळोवेळी आवश्यक मार्गदर्शन करण्यात येत आहे. इयत्ता ११ वी चे सर्व प्रवेश हे ऑनलाईन पध्दतीने व गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येत आहे.

************************************************************

ठाहुप
३२३

लक्षवेधी सूचना क्र.५६३

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. तुकाराम काते, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५६३ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई महानगरपालिका विभागातील चेंबूर विधानसभा विभागातील ग्रिट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी छेडा नगर मानखुर्द लिंक रोड येथील खारभूमी च्या जागेत इंडियन ऑइल नगर शंकरा कॉलनी येथील मोठे गोठे अनधिकृत बांधकामे शेड गोदामे गॅरेज दुकाने लॉजिंग बोर्डिंग अनधिकृत बार हॉटेल भू माफिया व समाजकंटक यांनी बांधून शासकीय जमीन हडप करण्याचा प्रयत्न केला असणे, त्याबाबत वारंवार जिल्हाधिकारी व महापालिकेचे संबंधित अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार करूनही कोणतेही कारवाई झाली नसणे, मानखुर्द लिंक रोड हा अनधिकृत लॉजिंग बोर्डिंग चा अड्डा झाला असून, त्या ठिकाणी सुरू असलेल्या अनधिकृत व्यवसायांकडे पोलिसांचेही दुर्लक्ष होत असणे अत्यंत गंभीर बाब असून शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

### मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे चेंबूर,ता. कुर्ला, जिल्हा मुंबई उपनगर येथील ग्रिट को. ऑप. हौसिंग सोसायटी लगत, इंडियन ऑईल नगर समोर, शंकरा कॉलनी नाल्याजवळ मोठ मोठे अनधिकृत शेड, गोदाम शासकीय जागेत बांधण्यात आली असून समाजकंटक भूमाफिया शासकीय व महापालिकेच्या ताब्यातील जागा हडपण्याच्या बेतात असून मोठ्या प्रमाणात या ठिकाणी आर्थिक व्यवहार सुरु असल्याची तक्रार मा. श्री. तुकाराम काते, विधानसभा सदस्य यांनी दिनांक ०८/०४/२०२५ रोजी उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.), चेंबूर यांच्या कार्यालयामध्ये दाखल केलेली आहे. याशिवाय उक्त ठिकाणी अनधिकृत बांधकाम होत असल्याच्या तक्रारी उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.) चेंबूर यांच्या कार्यालयामध्ये प्राप्त झालेल्या आहेत.

सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.), चेंबूर यांच्या निर्देशानुसार भूमापक यांनी दि.३०/०५/२०२५ व दि.०९/०७/२०२५ रोजी या जागेची स्थळ पाहणी केलेली आहे. त्यानुसार उक्त जागा ही मौजे चेंबूर, ता. कुर्ला न.भू.क्र. ८२३अ, क्षेत्र ९५९१५.७० चौ.मी. पैकी असून धारणाधिकार "जी" नवीन धारक सरकारी खुली जागा, श्री नारायण मंदिर समिती, माथाडी कामगार सहकारी संस्था व इतर ९ आरक्षणासाठी राखीव असल्याची नोंद मिळकत पत्रिकेवरुन दिसून येते.

सदर ठिकाणी अंदाजे २० लहान व मोठ्या स्वरुपाची बांधकामे करुन कॅटरींग, इवेन्टचे साहित्य, रद्दी कागदाचे गोदाम अशा वेगवेगळ्या कारणासाठी वाणिज्य वापर होत असल्याचे दिसून आले. परंतू संबंधितांकडे सदर गाळ्यांच्या बांधकामाबाबतची कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध झाली नाहीत. संबंधित

गाळेधारकांनी अनधिकृत बांधकामे करुन गाळे भाडेतत्वावर व्यवसाय चालविण्यासाठी दिल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदरहू जमीन महाराष्ट्र शासनाची असल्याचे दिसून येते.

प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.), चेंबूर यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ५० अन्वये दि.०७/०३/२०२५ रोजी सबंधित गाळेधारकांना नोटीस बजावून दि. २५/०३/२०२५ व दि. २०/०७/२०२५ रोजी सुनावणी घेऊन उप जिल्हाधिकारी (अति./ निष्का.) चेंबूर यांनी नगर भूमापन अधिकारी, चेंबूर यांना उक्त जागेची मोजणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

सदर प्रकरणी संबधित नगर भूमापन कार्यालयाकडून होणारी मोजणी व उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.), चेंबूर यांना त्यांच्याकडे सुरु असलेल्या सुनावणीमध्ये सदर जमिनीवर अतिक्रमण झाल्याचे निष्पन्न झाल्यास, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ५० अन्वये निष्कासनाची कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आल्याचे उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) चेंबूर यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

*******

लक्षवेधी सूचना क्र.१७५६
पु/६६७

सन २०२५ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. अभिजित पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे:-**

"राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत विविध वैद्यकीय वस्तू खरेदी करण्यात येणे, त्याकरीता महाराष्ट्र वस्तू खरेदी प्राधिकरणाने वैद्यकीय उपकरणे खरेदीकरीता १३ फेब्रुवारी, २०२५ रोजी काढलेल्या ५६ कोटी रुपयांच्या टेंडरमध्ये (टेंडर क्र.RT१४५) मोठ्या प्रमाणात अनियमिता व गैरव्यवहार झालेला असणे, वैद्यकीय वस्तू खरेदीचे टेंडर "हेल्थलॉन" या कंपनीला देण्यात येणे,सदर ठेकेदार कंपनीकडे आवश्यक कागदपत्र नसणे, सदर निविदा प्रकियेमध्ये एका उत्पादकाकडून अनेक डीलर्सला अधिकृतता दिलेली असणे,त्यामुळे स्पर्धात्मक तत्वांचे, सीव्हीसी मार्गदशन सुचनांचे तसेच महाराष्ट्र शासन खरेदी धोरणाचे उल्लंघन झालेले असणे, तसेच सदर टेंडरीची सर्व कागदपत्रे ऑनलाईन स्वीकारणे आवश्यक असतांनाही ऑफलाईन कागदपत्रे स्वीकारण्यात येणे, ऑटोक्लेव आणि मायक्रोस्कोप या उपकरणांना CDSCO (भारतीय केंद्रीय औषध नियंत्रण प्राधिकरण) चे प्रमाणपत्र आवश्यक असतांनाही हेल्थलॉन आणि मेड एक्सप्रेस फार्मा या ठेकेदार कंपनीने प्रमाणपत्र सादर केलेले नसणे, तसेच या निविदा प्रक्रियेमध्ये अनेक अटी-शर्तीचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास येणे, उक्त ठेकेदार कंपन्या पात्र नसतांनाही आर्थिक संगनमतातून त्यांना पात्र ठरविण्यात येऊन वैद्यकीय वस्तू खरेदीचे करार करण्यात येणे, त्यामुळे यासर्व प्रकरणामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येणे, शासनाने यासर्व प्रकरणी पारदर्शक चौकशी दोषी असलेल्या ठेकेदार तसेच त्यांना पाठीशी घालणा-या अधिका-यांवर कठोर कारवाई करण्याची तसेच सदर निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने निविदा काढण्याची आवश्यकता."

---

## श्री.प्रकाश आबिटकर, मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत औषधी व विविध वैद्यकीय वस्तु खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण स्थापन झालेले आहे. त्यांचेमार्फत खरेदीची प्रक्रिया पूर्ण केली जाते. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त आरोग्य सेवा आयुक्तालय सह संचालक (तांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या कार्यालयाकडून १) सेल काउंटर २) मायक्रोस्कोप ३) लॅब ऑटोक्लेव्ह ४) हिमोग्लोबिनो स्ट्रिप्स ५) डिजीटल हिमोग्लोबिनो मीटर ६) एक्सामिनेशन टेबल विथ लिथोटोमि पोझिशन अरेंजमेंट ७) लॅम्प विथ स्टॅण्ड असे एकूण ७ उपकरणांकरिता खरेदी प्रस्ताव प्राधिकरणास दि.२६/०८/२०२४ रोजी प्राप्त झाला होता. त्यानुषंगाने ई-१४५ क्रमांकाची निविदा दि.०६/०९/२०२४ रोजी महा टेंडर वर प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेमध्ये तीन निविदाकारांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी एकच निविदाकार तांत्रिक दृष्टया पात्र होत असल्यामुळे उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ मधील कलम ४.४.३.१ च्या तरतुदी नुसार सदर निविदा रद्द करण्यात येऊन वर नमुद एकूण ७ उपकरणांकरिता फेर निविदा आर टी- १४५ दि.१३/०२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदेची निविदा पूर्व बैठक दि.१८/०२/२०२५ रोजी घेण्यात आली.

त्यामध्ये एकूण १३ निविदाकारांनी सहभाग नोंदविला. सदर निविदेचा विक्री कालावधी दि.०८/०४/२०२५ पर्यंत होता. सदर निविदेमध्ये एकूण ५ निविदाकारांनी सहभाग नोंदविलेला असल्यामुळे निविदेचा तांत्रिक लिफाफा दि.०९/०४/२०२५ रोजी उघडण्यात आला. सदर निविदेमध्ये सहभागी असलेल्या निविदाकारांच्या कागदपत्रांची तांत्रिक छाननी करण्यात आली. त्यामध्ये मे. लाईफ लाईन सर्जिकल या निविदाकारांनी सर्व उपकरणाकरिता सहभाग नोंदविला नसल्यामुळे ते अपात्र झाले. उर्वरित ४ निविदाकारांची कागदपत्रे अपुर्ण असल्याने सर्वांना दि.२१/०४/२०२५ रोजी एकाच वेळी ई-मेल द्वारे त्रुटी कळविण्यात आल्या व कागदपत्रे सादर करण्याकरिता सर्वांना ४८ तासांची मुदत देण्यात आली होती.

पुढील प्रमाणे निविदाकारांना त्रुटी बाबत कळविण्यात आले. १) मे. हेल्थलॉन फार्मास्युटिक्लस यांच्या ३ त्रुटी असुन त्यांनी ३ त्रुटीची पूर्तता केली. २) सी. अभय कुमार ॲन्ड कं. व यांच्या ३ त्रुटी असून त्यांनी २ त्रुटीची पूर्तता केली. ३) मे. मेडएक्सप्रेस फार्मा इंडिया एल एल पी यांच्या ६ त्रुटी होत्या व त्यांनी सर्व ६ त्रुटीची पूर्तता केली. ४) मार्क एंटरप्राइझेस यांच्या ११ त्रुटी होत्या त्यापैकी त्यांनी ५ त्रुटीची पूर्तता केली. सदर निविदेमध्ये सी. अभय कुमार ॲन्ड कं., मार्क एंटरप्राइझेस या दोन निविदाकारांनी विहित कालावधीमध्ये कागदपत्रांची पूर्तता केली नसल्यामुळे त्यांना अपात्र करण्यात आले. त्यांना ई-मेल द्वारे दि.२४/०४/२०२५ रोजी त्यांच्या अपात्रतेबाबत कळविण्यात आले. दि.२९/०४/२०२५ रोजी मार्क एंटरप्राइझेस या निविदाकारानी आक्षेप नोंदविला. त्यामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत कागदपत्रे पुन्हा तपासण्यात आले व आक्षेपांमध्ये तथ्य आढळून न आल्याने तसे तक्रार अर्जदार यांना कळविण्यात आले.

विषयांकित निविदा, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ नुसार राबविण्यात आली आहे.

सदर निविदेमध्ये सर्वात जास्त मुल्याची वस्तू ही सेल काउंटर असून त्यांचे मुळ उत्पादक १) मे. ट्रांसएशिया बायोमेडिकल लि. (मे. हेल्थलॉन फार्मास्युटिक्लस) २) मे.एजीडी बायोमेडिकल प्रा. लि. (मे. लाईफ लाईन सर्जिकल) ३) मे. मेडसोर्स ओझोन बायोमेडिकल प्रा. लि. (मे. मेडएक्सप्रेस फार्मा इंडिया एल एल पी, सी. अभय कुमार ॲन्ड कं) ४) मे. ऐस्पन लॅबोरेटरिज (मार्क एंटरप्राइझेस) हे आहेत. दोन्ही पात्र झालेल्या निविदाकारांचे मुळ उत्पादक वेगवेगळे असून तक्रार दाराचे मुळ उत्पादक वेगळे आहेत. त्यामुळे एकाच ओईएम ने एकापेक्षा जास्त निविदाकरांना प्रमाणपत्र दिल्याचे म्हणणे योग्य नाही.

निविदेमधील आढळून आलेल्या त्रुटींचे कागदपत्रे दाखल करण्यासाठी सर्व निविदाकारांना ई-मेल द्वारे एकाच वेळी कळविण्यात आले होते. तसेच सर्व निविदाकारांनी त्रुटींचे कागदपत्रे ई- मेल द्वारे दाखल केली आहेत.

CDSCO च्या संकेतस्थळावरील उपलब्ध माहीतीनुसार जे उपकरण वर्गीकरण (Class A) मध्ये बसत असेल त्यास केवळ नोंदणी करणे आवश्यक आहे. तशी दोन्ही पात्र निविदाकारांची नोंदणी केल्याची कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

तक्रार अर्जदाराला दिलेल्या उत्तराने त्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दि.१/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील कलम ५.७.२ नुसार उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडे तक्रार दाखल केली असून त्याची सुनावणी सुरू आहे.



महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण निविदा क्र. आर टी-१४५ संपूर्ण प्रक्रिया नियमाप्रमाणे व पारदर्शकपणे केली असून कोणतीही अनियमितता घडलेली नाही.

*******************************************

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. ११९१.
सन २०२५ चे द्वितीय (पावसाळी अधिवेशन)

श्री. करण देवतळे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना खालीलप्रमाणे आहे.

" चंद्रपूर जिल्ह्यातील बेरोजगार प्रकल्पग्रस्तांची संख्या वाढत असणे, परंतु शासनाने वर्ग-३ वर्ग-४ मध्ये प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीविषयक भरती प्रक्रीयेकरिता कोणताही ठोस निर्णय घेतलेला नसणे, बेरोजगार प्रकल्पग्रस्तांची वयोमर्यादा संपुष्टात येत असून अत्यंत हालाकीचे व दारिद्राचे जीवनमान जगत असणे, प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या वर्ग-३ वर्ग-४ पदांवर नोकरी करिता थेट नियुक्ती प्रक्रिया सुरु करण्यात यावी व जलसंपदा विभागामध्ये सदरच्या प्रकल्पा करिता संपादित विभागात ५०% जागेवर प्रकल्पग्रस्त व प्रकल्पग्रस्तावर अवलंबून असणाऱ्या प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र धारकाना थेट नियुक्ती द्यावी या असणे, तसेच ज्या प्रकल्पग्रस्त व्यक्तीची वयोमर्यादा संपुष्टात आली आहे, अशा प्रमाणपत्रधारकांना एकमुस्त रक्कम ३०,००००० (तीस लाख) रुपये देण्यात यावे व राज्य शासनाच्या वेगवेगळ्या विभागात येणाऱ्या नोकर भरतीत जाहिरातीमध्ये आवेदन करण्यासाठी प्रकल्पग्रस्ताना परीक्षा शुल्क माफ करण्यात यावे, माजी सैनिक आणि दिव्यांग यांना परीक्षा शुल्क माफ असते याच धर्तीवर प्रकल्पग्रस्तांना परीक्षा शुल्क माफ करण्याची मागणी करणे, तसेच CTPS महाऔष्णिक वीजनिर्मिती केंद्र/कृषी विभागात ५०% नोकरीत आरक्षण देवून आणि त्या तत्वावर प्रशिक्षणार्थी म्हणून नोकरी पूर्व २५,००० रुपये मानधन तत्वावर नोकरी लागेपर्यंत देण्यात येत असणे, त्या धरतीवर प्रकल्पग्रस्तांना राज्य शासनाच्या कोणत्याही विभागात प्रशिक्षणार्थी म्हणून नोकरी सामावून घेईपर्यंत देण्यात यावे, त्यामुळे उपजीविकेचा प्रश्न सुटेल, यावर शासनाने घ्यावयाचा निर्णय व करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. मंत्री ( मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राकरीता ५२ गावे बाधित झाली असुन ७ गावे पूर्णत: व ४५ गावे अंशतः अशी एकुण ५२ गावे बाधित असुन ३४९२ प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र वितरीत करण्यात आली आहेत.पाटबंधारे प्रकल्पाकरीता ११ गावे बाधित असुन ९५० प्रकल्पग्रस्तांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आली आहेत.

चंद्रपुर महाऔष्णिक विद्युत केंद्र व पाटबंधारे प्रकल्पग्रस्त अशा एकूण ४४४२ प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र धारकापैकी २९१६ व्यक्तींना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राच्या आधारे नोकरीत सामावून घेण्यात आले आहे. चंद्रपूर जिल्हयात एकुण ४४४२ व्यक्तींना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र वितरीत करण्यात आली आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. एईएम-१०८०/३५/१६-अ, दि. २१.०१.१९८० अन्वये पुनर्वसन विषयक धोरणानुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबुन असणा-या व्यक्ती यांना शासकीय सेवा प्रवेशासाठी नोकरीत पसंती देण्याबाबत सवलत देण्यात आली होती. प्रकल्पग्रस्तांचे प्रमाणपत्र देण्याकरीता प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ चे कलम २(२) (अ)२(२) (क) (एक) (दोन) (तीन), ६ (कं) व ५ (क) मधील तरतुदीनुसार विहीत केलेल्या अटींच्या अधिनतेने तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व परिपत्रकानुसार प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येत आहे.

मा उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या पुर्णपिठाने दिनांक ९.७.२००९ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ, दि. २७ ऑक्टोंबर,२००९ अन्वये प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्या जाहिरात देवून संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवाराची पात्रता तपासून व स्पर्धा परीक्षेव्दारे गुणवत्तेनुसार करण्यात याव्यात असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय २७ ऑक्टोंबर, २००९ अन्वये पात्र प्रकल्पबाधित कुटुंबातील एका सदस्यास प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रा आधारे शासकीय नोकरीमध्ये ५% आरक्षण असुन प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबुन असणा-या व्यक्तींना शासकीय सेवेत गट-क व गट-ड मधील पदावर नेमणुका जाहिरात देवुन संबधीत पदांच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारांची पात्रता तपासुन व स्पर्धा परीक्षेद्वारे गुणवत्तेनुसार करण्यात याव्यात असे नमुद केले आहे. प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र धारकांना थेट नियुक्ती देण्याची व शासकीय नोकरीत ५०% आरक्षण देण्याबाबत कोणतीही तरतुद नसुन मा. सर्वोच्च न्यायालयाने विविध प्रकरणी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार शासकीय सेवेमध्ये कोणत्याही उमेदवारास थेट नियुक्ती देणे घट्नाबाह्य आहे.

ज्या शासकीय प्रकल्पास स्वतंत्र आस्थापना आहे , अशा प्रकल्पाकरिता ज्या प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहे अशा प्रकल्पग्रस्त कुटुंबातील नामनिर्देशित केलेल्या सदस्यांकरिता महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९, कलम ६(क) नुसार विशेष भरती मोहीम सुरू करून गट क व गड प्रवर्गातील पदांची भरती करतांना अशा स्वतंत्र आस्थापना असलेल्या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांकरिता एकूण पदांच्या ५० टक्के आरक्षणाच्या प्रमाणात भरती करणे आवश्यक आहे.

तसेच ज्या व्यक्तीची वयोमर्यादा संपुष्टात आली आहे, अशा प्रमाणपत्रधारकांना एकमुस्त रक्कम रुपये ३०,००,०००/- (तीस लाख) देण्याबाबत पुनर्वसन अधिनियम, १९९९ मध्ये कोणतीही तरतुद नाही. व नोकर भरतीत जाहिरातीमध्ये आवेदन करणा-या प्रकल्पग्रस्तांना परीक्षा शुल्क माफ करण्याची तसेच प्रशिक्षणार्थी म्हणुन नोकरी पुर्व रुपये २५०००/- दरमहा तत्वावर नोकरी लागेपर्यत मानधन देण्याबाबत पुनर्वसन अधिनियम, १९९९ मध्ये कोणतीही तरतुद नाही.

........................